पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर,वसई-विरार
सेक्टर-५, शांतीगार्डन, मिरारोड(पूर्व),जि.ठाणे ४०११०७
Phone No.022-29451003,
Email ID- cpoffice.mbvv@mahapolice.gov.in

जा.क्र.पोआ/मिभाववि/आस्था-1/001-25/ले.प.पा.यादी// 77 /2026 दिनांक :- 01.04.2026

# पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस शिपाई भरती सन 2024-25

## पोलीस शिपाई पदाचे लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी.

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार कार्यालयाच्या आस्थापनेवरिल सन 2024-25 करीता रिक्त असलेल्या 840 पोलीस शिपाई पदाची शारिरीक चाचणी व मैदानी चाचणी दि. 20.02.2026 ते दि. 10.03.2026, तसेच दि. 23.03.2026 ते दि. 25.03.2026 रोजीपर्यत आयोजित करण्यात आलेली होती. सदर शारिरीक चाचणी व मैदाणी चाचणी पुर्ण झालेली आहे.

शारिरीक व मैदानी चाचणीकरीता हजर असलेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार शारिरीक मोजमापात पात्र ठरले आहेत अशा उमेदवारांचे मैदाणी चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या गुणांची चेस्ट क्रमांकानुसार एकत्रित तात्पुरती यादी या कार्यालयाचे https://mbvv.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर दि. 28.03.2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम 2011 मधील नियम 4(2) व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणानुसार मैदानी चाचणीत किमान 50% व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांपैकी प्रवर्ग निहाय गुणवत्तेनुसार पदांच्या 1:10 या प्रमाणात लेखी परीक्षेकरीता पात्र उमेदवारांची यादी कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहून तयार करण्यात आलेली आहे. सदर यादी यासोबत संलग्न करुन या कार्यालयाच्या https://mbvv.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. या प्रवर्गनिहाय यादीप्रमाणे एकुण 8584 एवढे उमेदवार लेखी परीक्षेकरीता पात्र झालेले आहेत. सदरची प्रवर्गनिहाय यादी यासोबत जोडली आहे..

लेखी परिक्षेकरीता पात्र उमेदवार यादीबाबत काही हरकती असल्यास त्या संदर्भात आपले लेखी निवेदन/अर्ज दिनांक - 03.04.2026 रोजी 14.00 वाजे पावेतो या कार्यालयाच्या ईमेल आयडी sheetbranch1.mb-vv@mahapolice.gov.in वर सादर करावेत. तद्नंतर प्राप्त होणा-या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

दिनांक- 01/04/2026
ठिकाणी :- मिरा-भाईंदर, वसई-विरार

01/04/26
(दत्तात्रय शिंदे)
अपर पोलीस आयुक्त,
मिरा-भाईंदर, वसई-विरार

CamScanner